

संस्कृत साहित्य समिति

ऊरुभङ्ग



संस्कृत
साहित्य
सरिता
: ३०

भास-कृत

उरुभङ्ग

कथासार
अमरेन्द्र

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वो रा अँ न्ड कं प नी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ रा उं ड बि ल्डि ग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २.

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात.अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत-साहित्य-सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्हीं योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

परिचय

महाभारताच्या कथानकावर आधारलेलें भास कवीचें हें आणखी एक नाटक आहे. मूळ महाभारताच्या कथेंत भासानें या नाटकासाठीं बरेच फेरफार केलेले आहेत. उदाहरणार्थ, बलरामाचें भीम-दुर्योधनाच्या गदायुध्दाच्या वेळीं हजर राहाणें व दुर्योधनपुत्र दुर्जयाला अश्वत्थाम्यानें रणांगणावर राज्याभिषेक करणें यांसारख्या गोष्टी मूळ महाभारतांत नाहींत. नाट्यतंत्राच्या दृष्टीनें कवीनें केलेले हे कल्पित बदल आहेत.

महाभारतीय युध्द संपल्यानंतर सरोवरांत दडून बसलेल्या दुर्योधनाशीं भीमाचें गदायुध्द झालें. त्यांत भीमानें गदायुध्दाचा नियम मोडून दुर्योधनाच्या मांड्यांवर गदेचा प्रहार करून त्यांचा चुराडा केला, त्या भग्न केल्या. यावरून या नाटकाला उरु-(मांड्या) भङ्ग(मोडणें, छिन्नभिन्न करणें) असें नांव दिलेलें आहे.

'उरुभङ्गां'त मुख्यतः दुर्योधनाचीच स्वभावरेखा रेखाटलेली असून मरणसमयीं त्याला आपल्या पापकर्मांचा पूर्ण पश्चात्ताप झालेला दाखविला आहे. त्यामुळें नाटक वाचतांना दुर्योधनाविषयीं वाचकांच्या मनांत एक प्रकारची अनुकंपा निर्माण होते. पापाचें प्रायश्चित्त परिपूर्ण विटंबनेनें कसें होतें हें दाखविण्याचाहि कदाचित नाटककाराचा एक हेतु असू शकेल. विशेषतः रणांगणावर आई, वडील, मुलगा व राण्या भेटावयाला आल्या असतांनाचें प्रसंग या दृष्टीनें फार परिणामकारक आहेत. करुणरसाचा तर यांत उत्कट रंग पाहावयास सांपडतो.

—लेखक

उरुभङ्ग

कौरव-पांडवांचें भयंकर भारतीय युद्ध संपलें. शंभर कौरवांपैकीं एकटाच दुर्योधन उरला होता. तो रणांगण सोडून दूर एका सरोवरांत जाऊन लपला. त्याला पाण्यांत सुरक्षित राहाण्याची जलस्तम्भिनी विद्या येत होती. त्यामुळें तो कितीतरी वेळ त्या सरोवराच्या तळाशींच होता. पुष्कळ शोध केल्यावर अखेर पांडवांना त्याचा पत्ता लागला. तेव्हां भीमानें सरोवराच्या कांठावर येऊन दुर्योधनाला लढाईचें आव्हान दिलें. त्यानें त्याची खूप उणींदुणीं काढल्यावर तो बाहेर आला. आणि मग त्या दोघांचें गदायुद्ध सुरू झालें.

समंतपंचकाची रणभूमि प्रेतांनीं खचाखच भरून गेली होती. उरलेसुरले सगळे योद्धे त्यांच्याभोंवतीं जमा झाले. लढाईंत जखमी झालेले हत्ती, घोडे, राजे व शिपाई यांनीं त्या रणभूमीला एकाद्या भव्य पण फाटलेल्या चित्राचें स्वरूप दिलें होतें. त्यावरील आकृति अस्ताव्यस्त होऊन गेल्या होत्या.

रणांगणावर हत्तींचीं धुडें मरून पडलीं होतीं तीं मोठमोठ्या शिळांसारखीं दिसत होतीं. रथांतले योद्धे मरून खालीं पडल्यामुळें रथ रिकामे पडले होते. गिधाडांनीं या मेजवानीवर ताव मारण्यासाठीं जवळपासच आपलीं घरटीं बांधलीं होतीं. ज्या रथांतून अद्यापि मेलेले वीर पडलेले होते त्यांचीं प्रेतें खालीं ओढून खाण्यांत भालू गुंतल्या होत्या. किती भीषण दिसत होता तो समंतपंचक रणक्षेत्राचा देखावा. साऱ्या समंतपंचकाभर रक्ताचा सडा पडला होता. चिलखतें-चवऱ्यापासून बाण-भाल्यापर्यंत सर्व प्रकारच्या शस्त्रांचा तेथें खच पडला होता.

पण आतां हा रणयज्ञ संपला होता. त्यांत फक्त पूर्णाहुति पडावयाची राहिली होती ती दुर्योधनाची. तोच हा अखेरचा युद्धप्रसंग आतां सुरू झाला होता.

ढगांचा भयानक कडकडाट व्हावा किंवा पर्वत कोसळून पडावा तसा आवाज ऐकूं येत होता. भीम–दुर्योधनांच्या गदा एकमेकांवर आदळल्यामुळें झालेला तो आवाज होता. द्रौपदीचे केंस ओढावयास सांगणारा दुरात्मा दुर्योधन समोर उभा असलेला पाहून भीमसेन भयंकर खवळला

होता; तर आपल्या शंभर भावांची युद्धांत कत्तल झाल्यामुळें दुर्योधन अतिशय संतापलेला होता.

हें गदायुद्ध अटीतटीचें, अगदीं निकराचें होणार, यांत कोणा तरी एकाचा कायमचा निकाल लागणार हें स्पष्ट होतें. त्यामुळें कुरु व यदु कुलांतील जबाबदार मंडळी तेथें हजर होती. द्वैपायन व्यास यांचा पांडवांकडे विशेष ओढा, त्यामुळें ते उपस्थित होते. दुर्योधन हा बलरामाचा शिष्य. बलरामापासूनच तो गदायुद्ध शिकला. त्याला तो मानीतहि असे. त्यामुळें बलरामाचें दुर्योधनावर प्रेम होतें. म्हणून तोहि तेथें आला होता. श्रीकृष्ण हा तर पांडवांचा सखाच. तो अशा निकाराच्या कठीण प्रसंगीं तेथें जातीनें हजर राहिला तर तें साहजिकच होतें. विदुर तसा कौरवपक्षाकडील असला तरी तो सत्पक्षाचा अभिमानी होता. त्यालाहि या भयंकर प्रसंगाचा शेवट काय होतो याविषयीं उत्सुकता होतीच. त्यासाठीं तोहि तेथें आला होता.

तें गदायुद्ध होतेंच तसें भयंकर. तापलेल्या सोन्याच्या चौरस तुकड्याप्रमाणें दिसणाऱ्या त्या भीमाच्या छातीवर दुर्योधनाची गदा येऊन आदळली; आणि इंद्राच्या

ऐरावताप्रमाणें मजबूत असलेले दुर्योधनाचे खांदे भीमाच्या गदाप्रहारानें निखळून गेले. दुर्योधनाच्या हातांतील गदा भीमाच्या रक्तानें सारी माखून गेली होती आणि त्यामुळें ती इन्द्रानें कैलासशिखरावरून फेंकलेल्या वज्राप्रमाणें भासत होती.

दुर्योधन अतिशय आवेशानें व कौशल्यानें लढत होता; तरीपण भीमाचें बळ निःसंशय अधिक होतें. परंतु हळुहळु युक्तीनें शक्तीवर मात केली. भीमाच्या कपाळावर झालेली जखम फार खोल होती; त्यामुळें तेथून सारखी रक्ताची धार सुरू झाली. त्याचे ते पर्वतशिखरासारखे दिसणारे दोन्ही खांदे पार खिळखिळे होऊन गेले. छातीचीहि तीच गत झाली. मेरु पर्वतावरून नदीचा प्रवाह वाहात असतांना दिसावा त्याप्रमाणें त्या प्रचंड पुरुषाच्या शरीरावरून लाल लाल रक्ताचा प्रवाहच वाहातांना दिसत होता. हळुहळु भीम भयंकर रक्तस्रावामुळें खचूं लागला. दुर्योधनाच्या गदेचे भयंकर तडाखे एकामागून एक बसतच होते. त्याची ती अलौकिक शक्तीहि त्या गदाघातामुळें झालेल्या खोल जखमांपुढें टिकाव धरीनाशी झाली. वज्राघातानें जळून

गेलेला व खनिजद्रव्यें संपुष्टांत आलेला मेरुपर्वत कोसळावा तसा तो दिसूं लागला.

भीमाची ती दशा पाहून त्याच्याबद्दल प्रेम व आपुलकी असणारांची मनःस्थिति मोठी विलक्षण होऊन गेली. भीम खालीं कोसळत आहे आणि त्याच्या बहुतेक सर्व अवयवांच्या चिंधड्या होत आल्या आहेत हें पाहून द्वैपायन व्यास स्तंभित झाले. आपल्या हनुवटीला करंगळीचा आधार देऊन ते विचारमग्न होऊन वर पाहूं लागले. युधिष्ठिर अगदीं दीनवाणा झाला आणि विदुर तर अश्रु ढाळूं लागला. अर्जुनानें आपल्या गांडीव धनुष्याला हात घातला आणि भगवान श्रीकृष्णांनीं आपली दृष्टि आकाशाकडे लावली. बलरामाला मात्र आपल्या प्रिय शिष्याचा-दुर्योधनाचा जय होत असलेला पाहून आनंद वाटत होता. आणि त्याच आनंदांत गुंग होऊन तो आपल्या खांद्यावरील नांगर गरगरावीत होता.

निकराचा क्षण येऊन ठेपला होता. आतां भीम राहाणार कीं कायमचा अंतरणार हेंच ठरावयाचें होतें. श्रीकृष्णांनीं थोडा विचार केला. आणि एकाएकीं त्यांनीं भीमाकडे पाहून आपली मांडी थोपटल्यासारखें केलें.

तेवढ्या खुणेनें भीम काय समजावयाचें तें समजला. त्याच्या भुंवया एकदां आकुंचित झाल्या. त्यानें कपाळावरून निथळणारा घाम एका हातानें पुसून टाकला. आपल्या दोन्ही बलिष्ठ हातांनीं ती चित्रांगदा नांवाची भयंकर गदा सांवरली. तो भयंकर दिसूं लागला. त्याचे डोळे एखाद्या रागावलेल्या सिंहासारखे जळूं लागले. जमिनीवरून उंच उड्या घेत त्यानें भयंकर गर्जना करण्यास सुरुवात केली. आपला मुलगा संकटांत आहे हें पाहून जणूं कांहीं वायुदेवानें त्याला बळ दिलें असें दिसत होतें.

भीम जणूं बेभान झाल्यासारखा दिसूं लागला. त्यानें जमिनीवर आपल्या दोन्ही हाताचे तळवे घांसले आणि जोरानें दण्ड थोपटले. तो इतका संतापला होता कीं त्याचा आवाज एकाद्या गर्जनेसारखा वाटत होता. त्यानें आपली गदा दोन्ही हातांत घेतली. श्रीकृष्णाचा इषारा त्याला मिळालेला होता. दांतओंठ खाऊन आणि सारी दया माया गुंडाळून ठेवून त्यानें ती प्रचंड गदा आपला प्रतिस्पर्धी दुर्योधन याच्या मांड्यांवर जोरानें आदळली. दुर्योधनाच्या मांड्यांच्या चिंधड्या झाल्या. रक्तबंबाळ होऊन तो खालीं कोसळला.

अर्थात हें गदायुद्धाच्या नियमाला सोडून होतें. भीमाच्या त्या अकल्पित आघातानें दुर्योधन खालीं पडलेला पाहून द्वैपायन व्यास आकाशमार्गानें निघूनहि गेले. परंतु दुर्योधन अशा अधर्म-युद्धानें मारला जावा हें न खपण्यासारखी एक व्यक्ति तेथें होती. आणि ती फार बलवान होती; अतिशय रागीटहि होती. दुर्योधनावर त्या व्यक्तीचें प्रेमहि होतें. ती व्यक्ति म्हणजे दुर्योधनाचा गदागुरु बलराम.

कसा झाला तरी बलराम पांडवांनाहि गुरुस्थानींच होता. तो समोर असतांना गदायुद्धाचा नियम उघड उघड पायाखालीं तुडवून भीमानें दुर्योधनाच्या मांड्या चुरडल्या हें बलरामाला सहन होणें शक्य नव्हतें. त्याचा तो अपमानच झालेला होता. त्यामुळें दुर्योधनाला कोसळतांना पाहून बलरामानें आपले डोळे मिटून घेतले. पांडवपक्षाकडील मंडळींच्या तें लक्षांत आलें. बलरामाचा राग किती भयंकर असतो याची त्यांना कल्पना होती. त्यानें डोळे मिटले आहेत ते केवळ दुःखानें नव्हे तर त्याला अतिशय संतापहि आलेला आहे हें त्या मंडळींना समजून चुकलें. त्यामुळें त्यानें डोळे मिटले त्याचाच फायदा घेऊन तेवढ्या अवधींत त्यांनीं

बेफाम झालेल्या भीमाला तेथून पळवून नेलें. पांडव घाबरले होतेच; पण व्यासांनीं तेथून निघून जाण्यापूर्वीं भीमाला रणभूमीवरून ताबडतोब दूर घेऊन जाण्याबद्दल पांडवांना सूचना दिली होती. त्याप्रमाणें स्वतः श्रीकृष्णांनींच पुढें होऊन भीमाला आधार दिला व बाकीच्या पांडवांनीं त्याच्याभोंवतीं कडें करून ते सर्वजण त्याला तेथून घाई-घाईनें घेऊन गेले.

थोडा वेळ झाल्यानंतर बलरामानें डोळे उघडले, तेव्हां पांडव भीमाला दूर घेऊन जात असतांना त्यानें पाहिलें. रागानें त्याचे डोळे एवढाले झाले ! आणि तो भीम पांडवांच्या कोंडींतून बाहेर पडण्याची वाट पाहात त्यांच्या-मागेंच चालूं लागला.

तो जोरानें चालूं लागल्यामुळें त्याचा मुकुट हालत होता. त्याच्या गळ्यांतली पुष्पमाला जोरानें चालणाऱ्या श्वासोच्छ्वासामुळें किंचित वर उचलली जात होती. त्याच्या अंगावरचें उपरणें खालीं घसरत होतें तें तो सावरून धरीत होता. त्याच्या त्या काळचा वस्त्रामुळें ढगांनीं वेढलेला चंद्रमाच आकाशांतून खालीं उतरावा तसा तो दिसत होता.

एखादा वडवानल आंतल्या आंत धुमसत असावा तशी त्याची स्थिति झाली होती. आपल्यालाहि न मोजणाऱ्या भीमाला खाऊं कीं गिळूं असें त्याला होऊन गेलें होतें. राक्षसराज शाल्वानें यादवांच्या द्वारकेवर स्वारी केली तेव्हां बलरामानें त्याचा समाचार घेतला आणि त्याला ठार मारून त्याची सौभ नगरीसुद्धां उध्वस्त करून टाकली. हा पराक्रम बलरामानें आपल्या प्रसिद्ध नांगरानेंच केलेला होता. एकदां आपल्या प्रचंड शक्तीनें त्यानें यमुनेचा प्रवाहहि पालटवून टाकला होता. असा तो आपला प्रभावशाली नांगर घामानें डबडबलेल्या व रक्तानें माखलेल्या भीमाच्या विशाल छातीवर आदळण्यासाठीं बलरामाचे हात सळसळत होते. तो दुर्योधनाला उद्देशून म्हणत होता कीं, ' तूं आणखी थोडा वेळ तरी जीव धरून राहा; आणि भीम माझ्या हातून ठार झालेला पाहा. '

इतक्यांत त्याला दुरून दुर्योधनाची हांक ऐकूं आली. " भगवान हलायुध प्रसन्न व्हा, " दुर्योधन दुरून म्हणत होता. दुर्योधन मांडीला झालेल्या जखमांनीं मरणाच्या दाराशीं पडलेला आहे हें बलरामानें पाहिलेलें होतें. त्यामुळें तशा अवस्थेंतहि आपला हा शिष्य आपल्याला

हांक मारीत असलेला पाहून त्याला एक प्रकारें बरें वाटलें.

दुर्योधनाची अवस्था मोठी केविलवाणी झाली होती. अंगाला चंदनाची उटी लावावी तसें त्याचें सारें अंग जखमांच्या रक्तानें माखून गेलें होतें. चालतां येत नसल्या-मुळें ती हातांच्या साहाय्यानें एखाद्या लहान मुलासारखा जमिनीवरून फरफटत जात होता. तो कसाबसा बलरामापाशीं आला आणि त्याला शांत होण्यासाठीं विनवीत त्याच्या पायावर डोकें ठेवून म्हणाला, " महाराज, आपण राग सोडून द्या आणि पांडवांना जगूं द्या. आतां ते जगले तरच कुरुकुलाच्या पितरांचें तर्पण होण्याची शक्यता आहे. कारण आमचें आपसांतील वैर व युद्धाच्या गोष्टी आतां आमच्या सर्वांच्या बरोबरच संपलेल्या आहेत. "

परंतु बलराम तें ऐकायला तयार नव्हता. तो दुर्यो-धनाला म्हणत होता, " तूं आणखी क्षणभर धीर धर. मी माझ्या या नांगराच्या फाळानें पांडवांना त्यांचे रथ, घोडे व हत्ती यांसह परलोकाला पाठवून देतों आणि त्यांच्या मित्रांनाहि त्याच मार्गानें पाठवितों. " परंतु बलरामाची पांडववधाची प्रार्थना ऐकून या वेळीं दुर्योधनाला कांहीं बरें

वाटलें नाहीं. तो म्हणाला, "आतां काय या लढाईचा उपयोग ! जें व्हायचें तें होऊन गेलें आहे. भीमाची प्रतिज्ञा तडीला गेली, माझे शंभर भाऊ युद्धांत कामीं आले आणि माझी ही अशी दुरवस्था झाली. आतां लढाई करून तुम्ही काय मिळविणार ! "

बलरामाला मात्र तें पटेना. तो म्हणूं लागला, " माझ्या देखत तुला फसवलें याचीच मला खरी चीड आली आहे."

बलरामाला असें वाटत असलें तरी दुर्योधनाची मात्र वेगळी समजूत होती. भीमाच्या गदेंत भगवान श्रीकृष्णांनींच प्रवेश करून आपल्याला अन्तिम गति दिली असें तो बलरामाला म्हणाला. त्याच्या दृष्टीनें भीम हा केवळ निमित्तमात्र होता.

त्या दोघांचें असें बोलणें चाललें असतांनाच धृतराष्ट्र व गांधारी यांना घेऊन दुर्योधनाचा मुलगा दुर्जय तिकडे येतांना दिसला. त्याच्याबरोबर दुर्योधनाच्या दोन राण्या मालवी आणि पौरवीहि होत्या. धृतराष्ट्र एवढा पराक्रमी व मानी पण पुत्राच्या झालेल्या दुर्दशेनें अगदीं दीन होऊन गेला होता. दुर्योधनाचा कपटानें वध झाला हें ऐकून तर

त्याला कमालीचें दु:ख झालें होतें. तो व त्याच्या बरोबरची सर्व मंडळी दुर्योधनालाच शोधीत होती. त्याची आई गांधारी ' बाळा कोठें आहेस रे ? ' म्हणून टाहो फोडीत होती. त्याच्या राण्याहि 'महाराज' 'महाराज' करून विलाप करीत होत्या.

दुर्योधन एवढा धीराचा व शूर पण स्वत:च्या राण्यांची ती दीनवाणी अवस्था पाहून मात्र तोहि कळवळला. तोंपर्यंत त्याला स्वत:च्या चुरडलेल्या मांड्यांच्या जखमांचें दु:ख जाणवलें नव्हतें; परंतु आतां मात्र त्याला त्याच्या तीव्र वेदना होऊं लागल्या. अंत:पुरांत मखमलीच्या पायपोसांवरून चालणाऱ्या त्या राजस्त्रियांना उघड्यावर रणांगणांत यावें लागलें हीच गोष्ट दुर्योधनाला फार लागली. त्याला ऐकूं येत होतें कीं आपले वडील व आई आणि राण्या आपला शोध करीत आहेत. परंतु तशा दीन अवस्थेंत आपल्या प्रिय माणसांच्या नजरेला आपण पडूं नये अशी त्याची इच्छा होती. त्यामुळें त्यानें त्यांच्या हांकांना ओ दिली नाहीं. बराच वेळ हुडकूनहि दुर्योधन कोठें दिसत नाहीं असें समजल्यावर मात्र धृतराष्ट्राला आपला आंधळेपणा विशेष जाणवला.

आपला पति धृतराष्ट्र आंधळा असल्यामुळें गांधारीनेंहि आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधण्याचा नियम केलेला होता. मुलांना किंवा नातवंडांनाहि बघण्यासाठीं तिनें ती कधीं सोडलेली नव्हती. परंतु आतां शेवटचा मुलगा दुर्योधन पराभव पावून लवकरच मरणार असें पाहून मात्र तिचा धीर सुटत चालला.

शेवटीं धृतराष्ट्राच्या करुण हांकेला दुर्योधनानें कशीबशी ओ दिली. परंतु ते अस्पष्ट शब्द धृतराष्ट्रापर्यंत जाऊन पोहोंचलेसुद्धां नाहींत. वडिलांना वंदन करण्यासाठीं म्हणून त्यानें उठण्याचा प्रयत्न करतांच तो पुन्हा खालीं कोसळला. हा त्या मानी राजावर दैवाचा दुसरा कठोर आघात होता, त्यानें त्याला दु:खाचा अगदीं कढ आला.

गांधारीनें आपल्या सुनांना सांगितलें कीं, तुम्ही आपल्या पतीला शोधून काढा. म्हणून त्याहि शोधाला लागल्या.लहानगा दुर्जय आपल्या आजोबांचा अंगरखा हातीं धरून त्यांना पुढें नेऊं लागला तेव्हां ते त्याला म्हणाले कीं तूंच आपल्या वडिलांना हुडकून काढ. परंतु तो खरोखरीच फिरून फिरून दमला होता. त्यानें तसें सांगतांच

धृतराष्ट्र त्याला प्रेमानें म्हणाले कीं, " मग आपल्या वडिलांच्या मांडीवर जाऊन बैस बरें. "

दुर्जयानेंच अखेर जमिनीवर पडलेल्या दुर्योधनाला हुडकून काढलें. आपले वडील दिसतांच तो बाळ नेहमीं-प्रमाणें त्यांच्या मांडीवर बसण्यासाठीं धांवला. परंतु दुर्योधनानें त्याला " अरे अरे, थांब " असें म्हणून " आतां या जागेचा लोभ सोडून देण्यास " सांगितलें. त्या बिचाऱ्याला वडिलांच्या स्थितीची काय कल्पना ! दुःख म्हणजे काय तेंच त्याला आजवर माहीत नव्हतें. मुलाची ही स्थिति पाहून तर दुर्योधनाचें वात्सल्य उचंबळून आलें आणि त्यानेंहि त्याच्या दुःखांत भर घातली. ज्याला पाहातांच डोळयांना सुख व्हावें आणि अंतःकरणाला चंद्रदर्शनाचा आनंद व्हावा तोच त्याचा मुलगा त्याला आतां काळ बदलल्यामुळें दुःखदायक अग्नीसारखा ठरला होता. दुर्योधनानें आपल्या मांडीवर बसूं नको असें सांगतांच दुर्जयानें विचारलें, "बाबा, मग तुम्ही कोठें चाललांत ? " " माझे शंभर भाऊ गेले त्यांच्याच मागें, " दुर्योधनानें उत्तर दिलें. " मग मलाहि जा ना घेऊन आपल्याबरोबर, " अजाण दुर्जय त्यावर म्हणाला. " तें भीमसेनाला जाऊन

विचार बाळ ! " दुर्योधनाचें हें उत्तर त्या अजाण मुलाला कांहीं समजलें नाहीं. मग तो वडील सांपडले म्हणून सांगण्यासाठीं आजी-आजोबांकडे गेला व त्यांना तेथें घेऊन आला.

दुर्योधन धुळींत लोळत अस्ताव्यस्त पडलेला पाहून गांधारीच्या हृदयाचें पाणी पाणी झालें. धृतराष्ट्राला दुर्योधनानें कसाबसा नमस्कार केला आणि म्हटलें कीं, " मी तुमच्याच पायांशीं केवळ माझें हें मस्तक नमविलेलें आहे. साऱ्या बाजूंनीं आग पेटलेली असतांना मी तिचा जरासुद्धां विचार केलेला नाहीं. तेव्हां आतां ज्या वैभवांत मी जन्माला आलों त्याच वैभवांत मरण्याचें भाग्य मला लाभत आहे असें मी समजतों. "

आपले शंभर मुलगे ज्या मार्गानें गेलें त्याच मार्गानें आतां हा शेवटचाहि चाललेला पाहून धृतराष्ट्राच्या सर्व आशा संपल्या. त्यानें दुर्योधनाच्या जगण्याचीहि आशा आतां सोडून दिली. त्यामुळें त्या निराश, हताश धृतराष्ट्रापुढें जाण्यासाठीं बलरामाचेंहि मन घेईना.

दुर्योधनानें आपल्या आईला–गांधारीला हांक मारून म्हटलें, " आई, माझ्या हातून जर कांहीं सत्कृत्य घडलें असेल तर मला आशीर्वाद दे कीं, पुढल्या जन्मींहि मी तुझ्याच पोटीं येईन. " राण्यांना उद्देशून तो म्हणाला, " मी शत्रूशीं लढतांना जखमी होऊन मरण पावत आहें. मी रणाला पाठ दाखविलेली नाहीं. तेव्हां तुम्ही क्षत्रिया असल्यानें तुम्हांला शोक करण्याचें कारण नाहीं. तसेंच सर्व धार्मिक, व्यावहारिक कर्तव्यें मी यथासांग पार पाडलेलीं आहेत. मी मित्रांना साहाय्य केलें, शत्रूंना शरण यावयास लावलें आणि सर्व प्रकारचें राजवैभव माझ्या पायापाशीं राहात आलें. तेव्हां अशा वैभवसंपन्न राजाच्या राण्यांनीं शोक करणें बरोबर नाहीं. "

दुर्जयाला जवळ बोलावून तो जें बोलला तें तर विशेषच होतें. " बाळा दुर्जया ! " तो म्हणाला, " तूं माझ्याप्रमाणेंच पांडवांची सेवा केली पाहिजेस आणि पूज्य कुंतीमातेच्या आज्ञेंत राहिलें पाहिजेस. तसेंच अभिमन्यूची आई व द्रौपदी यांनाहि तूं आपल्या आईप्रमाणेंच मान देत जा. "

" बरें का बाळ, " दुर्योधन पुढें सांगूं लागला, " आपले

महान ऐश्वर्यशाली व स्वाभिमानी वडील दुर्योधन ह बरोबरीच्या शत्रूशीं लढतां लढतां समरांगणावर मरण पावले असें समजून तूं आपलें दुःख आवर. कारण यांत दुःख करण्यासारखें कांहीं नाहीं. उलट यामुळें तुला अभिमान वाटला पाहिजे. तसेंच मी मरण पावल्यानंतर जेव्हां युधिष्ठिर इतर पांडवांसह मला तिलांजली देईल तेव्हां त्याच्या हाताला हात लावून तूंहि मला पाणी दे."

आजपर्यंत जळत असलेल्या वैराग्नीचें रूपांतर पश्चात्तापाच्या जलप्रवाहांत झालें. त्यांत दुर्योधनाचा सारा ताठरपणा व दुष्टपणा वाहून गेला. इतक्यांत कोणीतरी धनुष्याचा टणत्कार केल्याचा आवाज बलरामाच्या कानीं पडला. त्यानें आश्चर्यानें त्या बाजूकडे पाहिलें तों कावळ्यांचे थवेच्या थवे आकाशांत इतस्ततः उडत असतांना त्याला दिसले. वास्तविक रणभूमीवर आतां मृत वीरांच्या प्रेतांखेरीज कोणीहि नव्हतें. सारें रणांगण शांत व निःस्तब्ध झालेलें होतें. असें असतांना धनुष्याची दोरी ओढल्याचा हा आवाज कोठून आला म्हणून बलराम चौकसपणानें पाहूं लागला. तोंच दुरून एक गर्जना त्याला ऐकूं आली.

" दुर्योधनानें आपलें धनुष्य सज्ज करून ज्या रणयज्ञांत प्रवेश केला त्यांतच आज मी पुन्हां प्रवेश करीत आहें. अध्वर्यूनें संपविलेल्या अश्वमेध यज्ञाला कोणीतरी पुन्हां प्रारंभ करावा तसेंच हें माझें करणें आहे. "

बलरामानें ओळखलें कीं द्रोणपुत्र अश्वत्थाम्याचा तो आवाज होता. इतक्यांत प्रत्यक्ष अश्वत्थामाच समोरून येतांना दिसला. पूर्ण उमललेल्या कमळासारखे त्याचे डोळे विशाल व स्वच्छ दिसत होते. चमचम करणाऱ्या सोन्याच्या कांबीसारखे असलेले त्याचे हात चांगले लांबसडक व तसेच मजबूतहि पण होते. रागानें धनुष्य सरसावीत तो पुढें येत होता, तेव्हां पेटलेल्या मेरु पर्वताप्रमाणें तो दिसूं लागला. तो म्हणत होता, " कपटानें मांड्यांचा चुराडा झालेला दुर्योधन मी नव्हे कीं बोथट व निष्प्रभ झालेल्या शस्त्रांचा कर्णहि मी नव्हें. मी आहें द्रोणांचा मुलगा. इथें रणांगणावर शस्त्रसज्ज होऊन आलों आहें. आणि शोधतों आहें कोणी शूर वीर माझ्याशीं लढायाला योग्य आहे किंवा काय तें ! "

परंतु खरें म्हणजे सारें भारतीय महायुद्ध आटोपल्या-

नंतर हा वीर रणक्षेत्रावर उतरत होता ! त्यामुळें स्वतः-च्या युद्धकौशल्याची त्याची ही बढाई अगदीं कुचकामाची होती. अश्वत्थाम्याला स्वतःलाहि या गोष्टीची जाणीव होती. महाभारतीय युद्धांतील शेवटचा समरप्रसंग म्हणजे भीम-दुर्योधनाचें गदायुद्ध. यांत कपटानें का होईना पण दुर्योधनाचा पराभव झाला. त्यावेळींसुद्धां हा गुरुपुत्र तेथें आपलें शौर्य दाखविण्यास हजर नव्हता. त्यावेळीं तो आपल्या वडिलांचें तर्पण करण्यांत गुंतला होता, त्यामुळें दुर्योधनाचा वध झाला असें त्यानें आतां कोणाला सांगितलें असतें तरी तें खरें कोण मानणार होता ? कोणीहि त्याच्यावर विश्वास ठेवला नसता. त्यामुळें भीष्म-द्रोणा-सारखे महावीर व अकरा अक्षौहिणी सैन्याचे अधिपति राजे दुर्योधनाच्या बाजूला उभे असतांनाहि त्याचा असा दीनवाणा अंत झाला त्याला कारण एक दैवच असें अश्व-त्थामा आतां मानूं लागला. हळुहळु तो मावळत्या सूर्या-प्रमाणें निस्तेज होऊन पडलेल्या दुर्योधनापाशीं येऊन पोहोंचला.

" कुरुराज हें काय ?" अश्वत्थाम्यानें एकदम विचारलें.

" गुरुपुत्रा, हें असंतोषाचें फळ मी भोगतों आहें."

" तर मग, राजा तुझ्या सत्काराचें मूळच आणून मी तुझ्यासमोर हजर करतों."

" म्हणजे तूं काय करणार ?"

त्यावर अश्वत्थाम्यानें प्रौढीनें उत्तर दिलें कीं, " माझ्या शस्त्रास्त्रांच्या बळावर मी कृष्णाला व पांडवांना युद्धांत नाहींसें करतों पाहा." श्रीकृष्णाची योग्यता व सामर्थ्य अश्वत्थामा जाणत नव्हता असें नाहीं. भगवान चतुर्भुज विष्णुच कृष्णरूपानें आलेला आहे हें समजण्याइतकें ज्ञान त्याला होतें.परंतु अशा महाबलाढ्य कृष्णालाहि मी जिंकून आणतों असें अश्वत्थामा सुचवूं इच्छित होता. परंतु दुर्योधनाला अश्वत्थाम्याबद्दल खरा आदर कधींच वाटला नव्हता. तो गुरुपुत्र असल्यामुळें तसें त्यानें पूर्वी उघडपणें बोलून दाखविलें नसेल किंवा यावेळींहि तो उघडपणें त्याचा पाणउतारा करूं इच्छित नव्हता. तसेंच त्याला यापुढें युद्ध नको होतें. त्यामुळें तो अश्वत्थाम्याला म्हणाला, " राज्याभिषिक्त राजे झाले तरी त्यांना शेवटीं पृथ्वीच्या मांडीवरच आपला देह टाकावा लागतो. कर्ण स्वर्गाला गेला, भीष्म मरण

पावलें, माझ्या समक्ष माझे शंभर भाऊ युद्धांत मारले गेले. आणि आतां माझी ही अशी दुर्दशा झाली आहे. तेव्हां गुरुपुत्रा, आतां तूं आपलें धनुष्य बाजूला ठेवून द्यावेंस हेंच बरें !"

'भीमानें कपटानें तुला मारलें' असें म्हणून अश्वत्थाम्यानें दुर्योधनाला डिवचण्याचाहि प्रयत्न केला. परंतु त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाही. आपण स्वाभिमानासाठींच युद्ध पत्करलें, असें सांगून दुर्योधनानें आपल्या साऱ्या पापकर्मांचा पाढा वाचला. "द्रौपदीला राजसभेंत फरफटत आणलें, कोवळ्या अभिमन्यूला लढाईंत क्रूरपणानें ठार मारलें आणि कपटी जुगारांत जिंकून पांडवांना रानावनांत, जंगली पशूंबरोबर हिंडावयाला लावलें. हीं माझीं कृत्यें ज्या पांडवांनीं सहन केलीं त्यांच्या दृष्टीनें पाहातां त्यांनीं माझा जो मानभंग केला तो कांहींच नाहीं असें म्हटलें पाहिजे." दुर्योधनाला खरोखरीच पश्चात्ताप झाला होता. त्यामुळें त्यानें अश्वत्थाम्याला आपल्या त्या पापांची आठवण देऊन पुन्हां पांडवांशीं लढाईला उभें न राहाण्याबद्दल विनंती केली.

परंतु अश्वत्थाम्याचा स्वभावच हट्टी होता. त्याच्या ठिकाणीं दिलदारपणाचा अभाव होता. त्यामुळें तो आपल्या प्रतिज्ञेलाच चिकटून राहिला. तो म्हणाला कीं, " कांहीं झालें तरी मी माझें ठरल्याप्रमाणें रात्रीं छापा घालून निजलेल्या पांडवांचा निःपात करणारच ! वास्तविक हें धर्मयुद्धाच्या नियमांना सोडून होतें. परंतु संतापानें बेभान झालेल्या व सूडानें जळणाऱ्या अश्वत्थाम्याला त्याची पर्वा नव्हती. त्यांतच अश्वत्थाम्यानें आपल्या या घोर व दुष्ट प्रतिज्ञेचा उच्चार करतांच " असें घडलेंच पाहिजे " म्हणून बलरामानें त्याला दुजोरा दिला. तेव्हां तर अश्वत्थाम्याला आणखी जोर आला. त्यानें दुर्जयाला पुढें बोलावून म्हटलें कीं, " तुला रीतसर राज्याभिषेक झालेला नसला तरी माझ्या–ब्राह्मणाच्या शब्दानें तुला राज्याभिषेक झाल्यासारखाच आहे. आतां तूं दुर्योधनाच्या वडिलार्जित राज्याचा राजा झाला आहेस."

परंतु दुर्योधनाला मात्र अश्वत्थाम्याच्या या कसल्याच

कृत्याबद्दल कांहीं उत्साह उरलेला नव्हता. त्यानें शांतपणें मृत्यूचें स्वागत करून स्वर्गलोकाची वाट धरली.

संस्कृत साहित्य सरितेची पुस्तकें

६ आणे

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि०

